B-०४६

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम्.ए., पीएच् डी.
**संचालक** (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

**संदर्भ : रासेयो/५४९/२०२३**

**दि : २८ Dec २०२३**

प्रति,
मा.प्राचार्य,
**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी सासवड पत्ता: मु पो सासवड तालुका पुरंदर जिल्हा पुणे ४१२३०१ ता.: पुरंदर जि: पुणे पिनकोड: 412301**

**विषय : २०२३-२०२४ राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर मान्यता देणेबाबत...**
**शिबिर संकल्पना - " युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास" अंतर्गत लोकसंख्या नियंत्रण जनजागृती**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आपल्या महाविद्यालयास सन २०२३-२०२४ वर्षातील विशेष शिबिराकरिता ५० (**अक्षरी पन्नास** )स्वयंसेवक शिबिरार्थी संख्या मान्य करण्यात आलेली आहे. त्यानुसार विशेष शिबिर आयोजनास आपल्या महाविद्यालयास प्रती स्वयंसेवक शिबिरार्थी रु. ७००/- प्रमाणे ५० स्वयंसेवक शिबिरार्थी संख्येकरिता रू. ३५००० अनुदान मंजूर करण्यात आलेले आहे. मंजूर अनुदानापैकी शासनामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार त्या-त्या वेळी अनुदानाचा हप्ता आपल्या रासेयोच्या स्टेट बँक इंडिया मधील झीरो बॅलेन्स खात्यावर पीएफएमएस द्वारे वर्ग करण्यात येईल. विशेष शिबिराचा खर्च प्रचलीत नियमानुसार संबंधीत ठेकेदार/पुरवठादार यांना पीएफएमएस द्वारे अदा करण्यात यावा

आपल्या प्रस्तावास अनुसरुन रासेयो विशेष शिबिरास कार्यक्रमाच दि. २२ Jan २०२४ पासून २८ Jan २०२४पर्यंत मु. **Ambale** ता. **Purandar** जि. **PUNE** या ठिकाणी आयोजन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेल्या शासन निर्णय क्र. रासेयो-२०१४/प्र.क्र. ४२/१४/साशि-७, दिनांक: ०६/०९/२०१४, (शासन निर्णय क्र. २०१४०९०६१६४२०२३००८) व शासन निर्णय क्र.रासेयो-२०१७/प्र.क्र.८४/१७/साशि-७, दिनांक: २६/०९/२०१७, (शासन निर्णय क्र. २०१७०९२६१५५१५८४४०८) परिपत्रकानुसार महाराष्ट्र राज्यातील सर्व विद्यापीठांमधील रासेयो संलग्नीत महाविद्यालयांमधील स्वयंसेवकांकरिता कृती आराखड्यानुसार उपक्रम राबवण्यात यावेत. याकरिता सरपंच, पंचायत समिती, ग्रामविकास अधिकारी, तलाठी व तहसीलदार इ. शासकीय अधिकारी/यंत्रणा यांची मदत घ्यावी. तसेच विद्यार्थी स्वयंसेवक व स्थानिक गावकरी यांच्या एकत्रित सहकार्याने विविध प्रकारचे उपक्रम विशेष शिबिराच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात व्हावेत ही अपेक्षा आहे.ह्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेल्या नियमावलीनुसारच आपले रासेयो शिबिर आयोजित करणे बंधनकारक आहे. शिबिरास वर्तमानपत्र, ट्विटर, फेसबुक, य्युट्यूब, इंस्टाग्राम, इतर सामाजिक माध्यमाद्वारे योग्य त्या सदरातून प्रसिद्धी द्यावी.

शिबिर संकल्पना - स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव अंतर्गत " युवकांचा ध्यास ग्राम- शहर विकास" संकल्पनेवर पुढील प्रमाणे उपक्रम राबवण्यात यावेत.

१. लिंगभाव संवेदनशीलता जाणीवजागृती
२. नदी स्वच्छता/जलस्रोत स्वच्छता व वृक्षारोपण
३. लोकशाहीतील सहभाग आणि मतदार जनजागृती
४. प्रधानमंत्री जन-धन व विमा योजना
५. ऐतिहासिक स्थळे संवर्धन व स्वच्छता अभियान
६. अन्न सुरक्षा जनजागृती
७. अपारंपरिक ऊर्जा / अक्षय ऊर्जा
८. पर्यावरण, जैवविविधता व अधिवास संवर्धन
९. मृदा व जल संवर्धन
१०. लोकसंख्या नियंत्रण जनजागृती

तसचे **" छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला ३५० वर्ष "** पूर्ण होण्याच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालयांनी विशेष शिबिर आयोजन करताना छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित व्याख्यानांचे अनिवार्यपणे आयोजन करण्यात यावे

शिबिराचे हिशेब केंद्रीय पद्धतीने सादर करावेत. हिशेबाच्या कागदपत्रांबरोबर 'ब' फॉर्म सादर करणे आवश्यक आहे. शिबिरानंतर सविस्तर अहवाल १० दिवसांच्या आत पाठवावा. त्यासोबत शिबिरातील उपक्रमाची छायाचित्रे, बातमी व कात्रणे पाठवावीत. शिबिर अहवालासोबत शिबिरात केलेल्या श्रमदानाचे मूल्यमापन करुन पाठवावे. योग्य त्या अधिकाऱ्यांचा (सरपंच/तहसिलदार/गटविकास अधिकारी) दाखला जोडावा. त्यात केलेल्या कामाचा अंदाज खर्च नमूद करावा. केंद्रीय लेखापरीक्षणाच्या वेळी देयाकांसोबत सदर मान्यतापत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.

रासेयो महाविद्यालये व परिसंस्थांना सूचित करण्यात येत आहे की स्थानिक प्रशासन, जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन, विद्यापीठ आणि महाराष्ट्र व केंद्र शासनाच्या नियमावलींना अनुरूप आणि त्यांच्या परवानगीने आपल्या स्तरावर रासेयो विशेष शिबिर आयोजित करण्यात यावे. तसेच आपत्ती व्यवस्थापनाच्या नियमानुसार एका ठिकाणी अधिक शिबिरार्थी एकत्रित येणार नाही याची दक्षता घ्यावी. या संदर्भात स्थानिक प्रशासनाचे नियम पाळावेत.

दत्तक गावाची निवड करताना महाविद्यालयांचे शिबिरार्थी शारिरीक अंतर राखून काम करतील आणि सुरक्षित निवासस्थानाबाबतची व्यवस्था गावातील पदाधिकाऱ्यांशी बोलून त्याची शहानिशा व खात्री करावी. विशेष शिबिर आयोजन करताना सहभागी स्वयंसेवकांचे दोन्ही पालकांकडून योग्य ते संमतीपत्र महाविद्यालयाने घेणे गरजेचे आहे. तसेच शिबिर आयोजन करताना सर्व शासकीय नियमावलींचे पालन करणे अत्यावश्यक आहे. ह्या सर्व बाबींचे पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या महाविद्यालयास विशेष शिबिर आयोजन करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

आपणास शिबिरासाठी हार्दिक शुभेच्छा ! कळावे, ही विनंती.

B-046

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७

प्रो. (डॉ.) सदानंद भोसले
एम.ए., पीएच.डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

कार्यालय क्र. : ०२०-२५६२२६८८/८९
: ०२०-२५६२२६९०/९१
: ०२०-२५६२२६९२
: ०२०-२५६९७३४१

संदर्भ : रासेयो/२६० दि. १० Aug २०२३

प्रति,
मा.प्राचार्य,
**पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी सासवड पत्ता: मु पो सासवड तालुका पुरंदर जिल्हा पुणे ४१२३०१ ता.: पुरंदर जि: पुणे पिनकोड: 412301**

**विषय: सन २०२३-२०२४ या वर्षासाठी राष्ट्रीय सेवा योजना एकक मान्यता.**

महोदय/महोदया,

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ साठी आपल्या महाविद्यालयास अनुक्रमे १०० असे एकूण १०० (शंभर) रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्येचे/ची एक एकक/के मंजूर करण्यात येत आहे/त. त्यानुसार प्रत्येक एककास स्वतंत्र कार्यक्रम अधिकारी मंजूर करण्यात आले/ला आहे/त. याकरिता आपल्या महाविद्यालयास रू.३६० प्रती विद्यार्थी x १०० रासेयो विद्यार्थी स्वयंसेवक संख्या = रु ३६००० या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात येत आहे. मंजूर अनुदानापैकी शासनामार्फत वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या अनुदानानुसार त्या-त्या वेळी अनुदानाचा हप्ता आपल्या रासेयोच्या स्टेट बँक इंडिया मधील झीरो बॅलेन्स खात्यावर पीएफएमएस द्वारे वर्ग करण्यात येईल. नियमित कार्यक्रमाचा खर्च प्रचलीत नियमानुसार संबंधीत ठेकेदार/पुरवठादार यांना पीएफएमएस द्वारे अदा करण्यात यावा.

१. महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या SC -११.८%,ST-९.४% व Other-७८.८% या संवर्गनिहाय तरतूदीनुसार रासेयोमध्ये स्वयंसेवकांना प्रवेश द्यावेत. त्यानंतर अल्पसंख्यांक विद्यार्थी संख्या स्वतंत्ररित्या नमूद करावी. प्रवर्गनिहाय संख्येनुसार रासेयो महाविद्यालयांना नियमित कार्यक्रमाचे अनुदान शासनामार्फत उपलब्ध होणार आहे याची नोंद घ्यावी.
२. महाविद्यालयाने रासेयो मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नये. अतिरिक्त विद्यार्थी संख्येची संपूर्ण जबाबदारी संबंधित महाविद्यालयाची राहील.
३. राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत निवड केलेल्या स्वयंसेवकांच्या नावांची वर्गनिहाय व प्रवर्गानुसार यादी रासेयो कार्यालयास online जमा करावी. (यादी पाठविल्यानंतर त्यात कुठल्याही परीस्थितीत बदल होणार नाही.)
४. रासेयो मासिक अहवाल (Monthly Report) प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत अपलोड करणे बंधनकारक आहे.
५. महाविद्यालयास स्वतंत्र पत्रव्यवहार न करता उपक्रमांसंदर्भात (nss.unipune.ac.in) या रासेयो लिंकवर वेळोवेळी परिपत्रके प्रसिद्ध केली जातील. त्यानुसार महाविद्यालयांनी कार्यक्रम आयोजित करून सदर अहवाल, छायाचित्र इ. रासेयो Web Portal वर तयार केलेल्या ठिकाणी अपलोड करावीत.
६. रासेयो नियमित कार्यक्रम व विशेष शिबिरे ह्या दरम्यान संचालक, रासेयो,विभागीय समन्वयक , जिल्हा समन्वयक पूर्वसूचना न देता भेट देतील. त्यामुळे रासेयो कार्यक्रमांची व शिबिरांची नियमितता व सुसूत्रता अबाधित ठेवण्याची सर्व जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची आहे.
७. प्रत्येक रासेयो एककाने दरवर्षी अध्यादेश १६३ बाबत रासेयो स्वयंसेवकांना परीक्षेपूर्वीच अवगत करावे आणि परीक्षेपूर्वीच त्यांचे अर्ज महाविद्यालयामार्फत online भरून सर्व प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करणे अत्यावश्यक आहे. याबाबत परीक्षेअगोदर रासेयो स्वयंसेवकांमध्ये जागृती करावी.
८. केंद्र व राज्य शासनाने निर्धारित केलेल्या रासेयो कृतिकार्यक्रमांचे आयोजन व अंमलबजावणीची जबाबदारी आपल्या एककावर अपरिहार्यपणे येते.
९. उपक्रम राबविताना शारिरीक अंतर राखून व प्रशासनाचे नियम पाळून उपक्रमांचे आयोजन करावे. ह्या सर्व बाबींचे काटेकोर पालन व निर्धारण करण्याच्या अटीवर आपल्या रासेयो एककास मान्यता देत आहे.

कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना

*टिप : केंद्रीय लेखापरीक्षणाच्या वेळी मानधनाकरिता मान्यतापत्र जोडणे आवश्यक आहे.*

विद्याविकास
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.
स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

**संदर्भ क्र.-वि.वि.मं. २०२३-२४/१२४** **दिनांक :** २१ Sep २०२३

प्रति ,
मा.प्राचार्य,
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ
गोविद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी सासवड पत्ता: मु
पो सासवड तालुका पुरंदर जिल्हा पुणे ४१२३०१ ता.: पुरंदर
जि: पुणे पिनकोड: 412301

**विषय : कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना मान्यता.**

महोदय/महोदया,

आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ करिता कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना राबवण्याबाबत विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणास आपण पाठविलेला प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. या योजनेबाबतच्या सर्व सुधारित नियम व अटींचे पालन करून वरील योजना आपल्या महाविद्यालयात ऑगस्ट २०२३ ते माहे फेब्रुवारी २०२४ ह्या दरम्यानच्या कालावधीत राबविणे अपरिहार्य आहे.

1. योजनेत सहभागी प्रत्येक व सर्व विद्यार्थ्यांना; त्यांनी केलेल्या प्रत्यक्ष कामाचा मोबदला (प्रति विद्यार्थी प्रति तास रुपये ४५/- याप्रमाणे एका दिवशी जास्तीत-जास्त ३ तासापर्यंतच) काम केलेल्या प्रत्येक महिन्यानंतर त्वरित संबंधित प्रत्येक / सर्व विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्येच लगतच्या पुढील महिन्यात १२ तारखेपर्यत जमा करणे अनिवार्य आहे.
2. या योजनेच्या नियमावलीनुसार प्रत्येक महाविद्यालय/परिसंस्थेतील विद्यार्थी विकास मंडळाचे राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये माननीय प्राचार्य व विद्यार्थी कल्याण अधिकारी यांच्या संयुक्त स्वाक्षरीने स्वतंत्र खाते असणे आवश्यक आहे. (या संयुक्त खात्याचा उपयोग फक्त विद्यार्थी विकास मंडळाकडूनच मंजूर झालेल्या या व इतर सर्व योजनांच्या अनुदानाचे वितरण व खर्च करणेसाठी करावा.)
3. विद्यार्थ्यांचे मानधन वितरणाची संपूर्ण प्रक्रिया हि " महाविद्यालय / परिसंस्थेने या योजनेसाठी निश्चित केलेल्या राष्ट्रीयीकृत बँक खात्यामधून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये " याच पद्धतीने असणे अनिवार्य आहे. या विहित पद्धती शिवाय इतर कोणत्याहि प्रकारे/ पद्धतीने विद्यार्थ्यांचे मानधन वितरण अनुज्ञेय नसून ते अग्राह्य मानले जाईल व संबंधीत लेखे अस्विकृत करण्यात येतील.
4. कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेच्या नियमावलीनुसार या योजेतील सहभागी विद्यार्थ्यांना त्यांचे मानधन प्रत्येक महिन्याच्या समाप्तीनंतर तात्काळ लगतच्या महिन्याच्या १२ तारखेपर्यत त्यांच्या बँक खात्यात जमा करणे अनिवार्य आहे. असे न झाल्यास त्या त्या महिन्याचे अदा केलेले मानधन लेखापरीक्षणातून वगळले जाईल आणि विद्यापीठाकडून अशा विलंब केलेल्या मानधनाचे अनुदान मिळणार नाही.
5. विद्यार्थी विकास मंडळाच्या निर्देशानुसार सदर योजनेत सहभागी विद्यार्थ्यांना एकूण जास्तीत जास्त तीन तासापर्यंतच काम देता येईल.
6. सदर योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व व एकूण स्वरूप लक्षात येण्यासाठी आळीपाळीने कार्यालयीन व क्षेत्रीय कामकाज देण्यात यावे.
7. योजनेतील सहभागी विद्यार्थ्यांना परीक्षा कालावधी व सार्वजनिक सुट्ट्या सोडून काम देण्यात यावे.
8. सदर योजना आपल्या महाविद्यालयात फेब्रुवारी २०२४ अखेर या दरम्यानच्या कालावधीतच राबविणे अनुज्ञेय आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी योजनेच्या प्रचलित सर्व नियम व अटींचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. विद्यार्थी विकास मंडळ प्राधिकरणाच्या नियमावलीत न राहता उपक्रमासंबंधी झालेल्या कार्यवाहीचा व वार्षिक लेख्यांचा वार्षिक लेखा परीक्षणाच्यावेळी विचार केला जाणार नाही. कळावे, हि विनंती.

आपला,

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

**टिप: १).योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही बदल झाल्यास स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.**

**२).मागील शैक्षणिक वर्षात या योजनेअंतर्गत आपणास विद्यापीठाकडून अनुदान प्राप्त झाले असल्यास आणि आपल्या महाविद्यालयाने या प्राधिकरणास आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्याबाबत माहिती पाठविलेली असेल तर 'कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका' योजनेसाठीची प्रथम हफ्त्याची रक्कम रु. ३१०००/- 'RTGS' द्वारे आपल्या महाविद्यालयाच्या बँक खात्यात जमा केली जाईल.**

| Name on Account | Account No | Bank Name | Branch Name | IFSC Code |
|---|---|---|---|---|
| PRINCIPAL SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE OF PHARMACY SASWAD EARN AND LEARN SCHEME | 11655862366 | State Bank of India | PURANDHAR SASWAD | SBIN0001135 |

PR029

विद्याविकास

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

स्वरसंग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

**संदर्भ क्र.-वि.वि.मं. २०२३-२४/२२६** **दिनांक :** १९ Oct २०२३

प्रति ,
**मा.प्राचार्य / संचालक,**
पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे जिल्हा शिक्षण
मंडळाचे शेठ गोविद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ
फार्मसी सासवड पत्ता: मु पो सासवड तालुका
पुरंदर जिल्हा पुणे ४१२३०१ ता.: पुरंदर जि: पुणे
पिनकोड: 412301

**विषय : 'निर्भय कन्या अभियान योजना' मान्यतेबाबत...**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

विद्याविकास
स्वरंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. अभिजीत कुलकर्णी
संचालक

महोदय/महोदया,

आपल्या प्रस्तावास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ या वर्षासाठी 'निर्भय कन्या अभियान' योजना राबविण्याबाबत विद्यापीठाकडे आपण पाठवलेला प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ व आपले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सदर योजना आपल्या महाविद्यालयात राबवावी. त्यानुसार या योजनेत समाविष्ट होणाऱ्या प्रत्येक महाविद्यालयाने स्वतंत्रपणे ही योजना राबवावी. महाविद्यालयातील तसेच समाजातील सर्व वयोगट, प्रवाह, स्तर, यातील महिलांना केंद्रस्थानी ठेऊन उपक्रमाचे आयोजन करावे. शैक्षणिक परिक्षेत्राशी संबंधित विद्यार्थिनी, शिक्षिका, पालक वर्गातील स्त्रियांचा विधी-न्याय व कायदा सुव्यवस्था यंत्रणेशी सुसंवाद घडविण्याचे हे अभियान एक माध्यम असावे.ही योजना आपल्या महाविद्यालयात स्वतंत्रपणे राबविताना आपल्या महाविद्यालयामधील जास्तीत जास्त विद्यार्थिनींना या योजनेत समाविष्ट करावे. अपवादात्मक स्थितीत आपल्या महाविद्यालयातून ५० पेक्षा कमी विद्यार्थिनी या योजनेत सहभागी होत असल्यास अशा महाविद्यालय/परिसंस्थांनी आयोजनापुर्वी संचालक, विद्यार्थी विकास मंडळ तसेच संबंधित जिल्हा समन्वयक यांचेशी विचारविनिमय करून योजनेची रूपरेषा निश्चित करावी. योजनेच्या अंमलबजावणी दरम्यान मार्गदर्शिकेत नमूद नसलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी झालेल्या कार्यवाहीचा विचार केला जाणार नाही. (या योजनेत आपल्या महाविद्यालयांमधीलच जास्तीत जास्त विद्यार्थिनींना समाविष्ट करावे तथापि आवश्यकतेनुसार अन्य स्थानिक महिलांनादेखील आमंत्रित करता येऊ शकेल.)

सदर योजना राबविताना; महिला सबलीकरण, महिलांचा व्यक्तिमत्व विकास, स्त्रियांची प्रेरणास्थाने , स्त्रियांचे स्वास्थ्य, महिला उद्यमशीलता, स्त्री-पुरुष समानता, स्त्रियांसाठी समान संधी, लिंगभाव जागृती – सहसंवाद - सहवेदना, विवाहपूर्व समुपदेशन, महिलांचा सामाजिक व कौटुंबिक सुसंवाद. विद्यार्थिनी-पालक-शिक्षक परस्पर सहसंवाद, महिलांची परिस्थितीजन्य निर्णयक्षमता तसेच स्त्री हक्क-अधिकार- विषयक नियम - संहिता - कायदे.स्त्रियांचे घटनादत्त आणि संवैधानिक अधिकार, स्त्रियांविरुद्ध अयोग्य वर्तन, अन्याय, कुठल्याही प्रकारची हिंसा, मानसिक, शारीरिक, सामाजिक इत्यादी स्वरूपाचा आघात, अनुचित शेरेबाजी, अनुचित मागणी, अनुचित विनंती, तसेच इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक, शाब्दिक, अशाब्दिक स्वरुपाची अस्वागतार्ह अथवा अस्विकारार्ह वागणूक तसेच स्त्रियांच्या आत्मसन्मानाला बाधा पोचेल अशा कोणत्याही स्वरूपाच्या वर्तनापासून अथवा अनुभवापासून संरक्षण आणि यांचा प्रतिकार व प्रतिबंध इत्यादी बिंदूंवर आधारित विषयाच्या स्वरूपानुसार व्याख्यान आणि / अथवा प्रशिक्षण सत्र - शिबीर आयोजित करावे. याकरिता नजीकच्या परिसरातून प्राधान्याने शक्यतो महिला पोलीस अधिकारी, विधिज्ञ, प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, प्रशिक्षित अथवा व्यावसायिक सामाजिक कार्यकर्ता, मानसशास्त्रज्ञ, समुपदेशक, पत्रकार यासारख्या तज्ञ मार्गदर्शकांना आमंत्रित करावे. या माध्यमातून विद्यार्थिनींना बौद्धिक, शारीरिक, मानसिक, भावनिक इत्यादी स्तरावर सक्षम बनविण्याच्या दृष्टीने हि योजना राबवावी. **सदर उपक्रमाचे आयोजन माहे फेब्रुवारी २०२४ पर्यंतच करणे अनिवार्य असून सदर योजना राबविण्यासाठी विद्यापीठ विद्यार्थी विकास मंडळाकडून खालील प्रमाणे अर्थसाहाय्य करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

विद्याविकास
स्वररंग
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## विद्यार्थी विकास मंडळ

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

**डॉ. अभिजीत कुलकर्णी**
**संचालक**

<table>
<tr><td colspan="3">१. प्रत्यक्ष / ऑनलाईन व्याख्यान<br><br>**(अधिकतम रुपये ३,००० पर्यंत )**</td><td colspan="3">**किंवा**<br>२. व्याख्यान तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण अशा दोन्ही उपक्रमाचे आयोजन<br>**(अधिकतम रुपये ५,००० पर्यंत )**</td></tr>
<tr><td colspan="2"></td><td>रुपये</td><td colspan="2"></td><td>रुपये</td></tr>
<tr><td rowspan="3">१.१</td><td rowspan="3">प्रती तज्ञ व्यक्ती मानधन रुपये १,०००/-<br>(याप्रमाणे जास्तीत-जास्त ३ व्याख्याने )</td><td rowspan="3">३,०००</td><td>२.१</td><td>प्रती तज्ञ व्यक्ती मानधन रुपये १,०००/-<br>(याप्रमाणे जास्तीत-जास्त २ व्याख्याने)</td><td>२,०००</td></tr>
<tr><td>२.२</td><td>स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण</td><td>२,०००</td></tr>
<tr><td>२.३</td><td>आयोजन खर्च</td><td>१,०००</td></tr>
<tr><td colspan="2">**एकूण**</td><td>**३,०००**</td><td colspan="2">**एकूण**</td><td>**५,०००**</td></tr>
</table>

**याचे कोणत्याही स्तरावर उल्लंघन झाल्यास या योजनेची मान्यता तत्प्रभावी रद्दबातल होऊन त्याबाबतची प्रशासकीय/आर्थिक सुरक्षात्मक स्वरूपाची सर्व जबाबदारी महाविद्यालय/परिसंस्थेची असेल. सदर योजना आपल्या महाविद्यालयात माहे फेब्रुवारी २०२४ पर्यंत राबविणे अनुज्ञेय आहे.**

आपला,

संचालक (अतिरिक्त कार्यभार),
विद्यार्थी विकास मंडळ

PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S

# SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE OF PHARMACY

SASWAD, TAL. : PURANDAR, DIST. : PUNE - 412 301. MAHARASHTRA, INDIA.

**Approved by :** All India Council for Technical Education and Pharmacy Council of India, New Delhi.
Government of Maharashtra and Directorate of Technical Education, Mumbai. (DTE Code No. 6372) MSBTE Code-1973
**Affiliated to :** Savitribai Phule Pune University, Pune. (Id. No.: PU / PN / PHARMA / 095 / [1993] and Code No. - 521)

**Phone :** (02115) 222212 **E-mail :** sgrs_contact@yahoo.co.in **Website :** www.pdeasgrsbpharm.edu.in
Accredited by NAAC at 'A' grade

Outward No. : COPS / 807 / 2023-24 Date : 07/03/2024


President
**Ajit Pawar**

Vice President
**Rajendra Ghadge**

Hon. Secretary
**Adv. Sandeep Kadam**
Senate Member
Savitribai Phule Pune University, Pune

Treasurer
**Adv. Mohanrao Deshmukh**

Dy. Secretary
**L. M. Pawar**

Principal
**Dr. R.S. Chavan**


वि.वि.मं.नोंदणी क्रमांक :- PR029

प्रति,
मा. संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय : विद्यार्थी विकास मंडळाच्या २०२३-२०२४ मधील योजनांचे देय अनुदान.

महोदय,

आमच्या महाविद्यालयात / परिसंस्थेत २०२३-२०२४ मध्ये राबविल्या गेलेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाच्या विविध योजना / उपक्रमांचे विनिमय तथा अनुदान विवरण पुढीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| महाविद्यालयाचे नाव | पुणे जिल्हा शिक्षण मंडळ पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी सासवड पत्ता: मु पो सासवड तालुका पुरंदर जिल्हा पुणे ४१२३०१ ता.: पुरंदर जि: पुणे पिनकोड: 412301 | | |
| महाविद्यालयाचे खाते क्र व खाते पुस्तकावरील नाव | ११६५५८६२३६६, PRINCIPAL SETH GOVIND RAGHUNATH SABLE COLLEGE OF PHARMACY SASWAD EARN AND LEARN SCHEME | आयएफएस कोड: | SBIN0001135 |
| विद्यार्थी कल्याण अधिकारी खाते क्र. व खाते पुस्तकावरील नाव | ३०९८१८३६९४३, PRADNYA NILESH JAGTAP | आयएफएस कोड: | SBIN0001135 |

| अ. क्र. | योजना / उपक्रम | मान्य अनुदान | प्रथम हप्ता | प्रत्यक्ष झालेला खर्च | अनुज्ञेय रक्कम | सही (For Office Use) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना | ७५००० | ३१००० | ४४००० | ४४,०००/- | [signature] |
| २ | निर्भय कन्या अभियान | ५००० | ० | ९०९२ | ५०००/- | [signature] |
| ३ | विद्यार्थी विकास अधिकारी यांचे मानधन | ६००० | ० | ० | ६,०००/- | [signature] |
| | एकूण रक्कम | ८६००० | ३१००० | ५३०९२ | | |

[signature]
स्वाक्षरी,
विद्यार्थी कल्याण अधिकारी
(जगताप प्रज्ञा निलेश
९९८९०४११०७)

STUDENTS DEVELOPMENT OFFICER
PUNE DISTRICT EDUCATION ASSOCIATION'S
SETH GOVIND RAGHUNATH SABLE
COLLEGE OF PHARMACY, SASWAD
TAL. PURANDHAR, DIST. PUNE- 412301

[signature]
स्वाक्षरी,
प्राचार्य / संचालक
(राजश्री सुनील चव्हाण
९८२२२५८४७४)

प्राचार्य
पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे
शेठ गोविंद रघुनाथ साबळे
कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड